Reg. No.: MH-NGP/0000167
INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES
© VMS RESEARCH FOUNDATION www.ijrssis.in

# डॉ. राममनोहर लोहिया यांचे समाजवादी विचार

धर्मदास वि. घोडेस्वार
समाजशास्त्र विभाग चिंतामणी महाविद्यालय पोंभूर्णा, जि. चंद्रपूर
*Corresponding Author: dvg1202@rediffmail.com

| Communicated : 02.01.2023 | Revision : 08.01.2023<br>Accepted : 15.01.2023 | Published: 27.01.2023 |
|---|---|---|

**सारांश :-**

मार्क्सवादी तत्वज्ञानाचे विशेष आकर्षण त्यातच गांधीच्या तत्वज्ञानाचा विशेष प्रभाव असतांना डह. लोहिया यांनी या दोहोंच्या परस्पर विरोधी विचारामधून मध्यम मार्ग काढून भारतीय समाजातील परिस्थितीशी सुसंगत लक्षाची व उद्दिष्टाची पुर्ती करण्याच्या दृष्टिकोनातूनच आपल्या समाजवादी विचारांची मांडणी केली. साम्यवाद व भांडवलशाही या दोन्ही व्यवस्थेतील सत्तेचे केंद्रीकरण स्वातंत्र्य व समता यात संतुलन नसणे, विषमतेची उत्पत्ती व व्यक्तीच्या उपक्रमशिलतेचा ऱ्हास अशा अनेक दोषांमुळे या दोन्ही व्यवस्था अप्रस्तुत ठरल्या असे ठोस विचार प्रतिपादन करून व्यक्तिस्वातंत्र्य व उपक्रमशीलतेला वाव राजकीय व आर्थिक सत्तेच्या विकेंद्रीकरणाचा पुरस्कार, उपभोग व वितरण या क्षेत्रातील सहकारी तत्वांचा अवलंब आणि रचनात्मक कार्यातून समाजवाद साधला जाणे त्यासाठी लोकशाही मार्गाचा वापर करणे असेच लोहिया यांना अपेक्षित आहे. असमानता संपवूनच समाताधीष्टीत समाजाची निर्मिती होऊ शकते यासाठीच त्यांनी भांडवलशाही व साम्यवादी या दोन्ही व्यवस्थांना विरोध करून लोकशाही मार्गाने समाजवादाच्या स्थापनेवर जोर दिला.

**बीजसंज्ञा :-** भांडवलशाही, साम्यवाद, असमानता, उदारमतवाद, लोकशाही, विकेंद्रीकरण, स्वातंत्र्य.

**प्रस्तावना :**

समाजवादी विचारावर डॉ. राममनोहर लोहिया यांची अतूट श्रध्दा होती. किंबहुना समाजवादी विचार प्रत्यक्षात साकार करण्यासाठीच त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य खर्ची घातले आपल्या समाजवादी विचारांची मांडणी करीत असतांना डॉ. लोहिया यांनी भारत देशातील आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय परिस्थितीचा साकल्याने विचार केला. या समाजवादी विचारात त्यांनी केवळ पाश्चिमात्य विचार विश्वातील संकल्पनांचे चर्चितवर्णन न करता त्यांचे सखोल मूल्यमापन करून स्वत:चा वेगळा विचारव्यूह प्रतिपादन केला. यात त्यांनी व्यक्तीनिष्ठ आणि अनिर्बंध स्पर्धा यावर आधारलेली भांडवलशाही तसेच उत्पादन साधनावर सामाजिक मालकी प्रस्थापित करणारा या एकमेकांचे पर्याय म्हणून जगासमोर आलेल्या दोन्ही व्यवस्थांची चिकित्सा करून त्यातील सामाजिक दोषांचे दिग्दर्शन कारून एका तिसऱ्या नव्या सभ्यतेची रूपरेषा ते सदर करतात आणि तो म्हणजे डॉ. लोहिया यांनी मांडलेला समाजवाद होय.

डॉ. लोहिया यांना सुरुवातीपासूनच मार्क्सवादाचे आकर्षण होते. त्यातच गांधीवाद

सुद्धा त्यांच्या विचाराचा पाया होता. या आधारावरच त्यांनी "मार्क्स, गांधी आणि समाजवाद" या स्वलिखीत पुस्तकात आपल्या स्वतंत्र अशा समाजवादी विचारांची मांडणी करून याविषयक सखोल व सविस्तर उहापोह केला. मार्क्स आणि गांधी या दोहोंच्या विचारामधील आदर व चांगल्या तत्वाची निवड करून त्यांनी नवीन व मध्यम मार्ग काढण्याचा प्रयत्न केला. त्यातूनच त्यांचे समाजवादी विचार निर्माण झाले आहेत. डॉ. लोहिया म्हणतात, "युरोपातील समाजवादी विचारवंत हे आपल्याच राष्ट्रातील समस्यांची सोडवणूक करण्यात अडकून पडलेले असून ते वैश्विक वास्तवापासून कोसो दूर आहेत." त्यामुळेच लोहिया हे आपल्या परीस्थितीशी अनुकूल असणाऱ्या व समस्यांचे सुद्धा उचित समाधान करू शकणाऱ्या समाजवादावर अधिक जोर देतात. एकूणच लोहिया यांनी भांडवलशाही, साम्यवाद व गांधीवाद या तिन्ही मधील ग्राह्यांश घेण्याची तयारी दाखविलेली आहे.

भारतात असलेली गरिबी, जातीयता व विविध आधारावरील असमानता ही दूर झाल्याशिवाय समताधीष्टीत समाजाची निर्मिती होणार नाही. समताविना समृद्धी अशक्य आहे आणि समृद्धीशिवाय समता व्यर्थ आहे. म्हणूनच लोहिया यांनी आपल्या समाजवादी विचारात गरिबीच्या समान वितरणावर नव्हे तर समृद्धीच्या जास्तीत जास्त वितरणाचा आग्रह धरला. भारतीय समाजवादाविषयी लोहिया म्हणतात, "भारतीय सामाजवादाने दुसऱ्याकडून घेतलेल्या उदारीच्या श्वासावर अवलंबून राहू नये. भारतीय समाजवादी विचारवंतानी दीर्घकाळापासून साम्यवादी तत्वज्ञानातील आर्थिक लक्षांना स्वीकारले. भांडवलवाद तथा उदारमतवादातील सामान्य आणि बिगर आर्थिक अशा तत्वांचा स्वीकार केला आहे. परंतु भारतातील आतापर्यंतचा समाजवाद हा स्वताला साम्यवाद व भांडवलवादाच्या प्रभावातून मुक्त करू शकला नाही. जो पर्यंत भारतीय समाजवाद त्याची म्हणजे भारतीय समाजातील परिस्थितीशी सुसंगत अशी लक्ष्ये व उद्दिष्टे निश्चित करीत नाही तो पर्यंत तो युक्तिहीन व फारशी उपयुक्तता नसणारा सिद्धांत बनून राहील."

**भांडवलशाही व साम्यवाद अमान्य :–**

भांडवलशाहीमध्ये मुख्यता नफ्याकडे लक्ष पुरविले जाते. अत्यावश्यक वस्तूबाबतही नफेखोरी किंवा साठेबाजी करण्यात येत असते. त्यातच अत्यावश्यक किंवा मूलभूत गरजाबाबतही जास्तीत जास्त नफा हे उद्दिष्ट ठेवले जाते. त्यामुळे गरिबीत जीवन जगणाऱ्या बहुसंख्यांक लोकांची मोठ्या प्रमाणात परवड होते. जगाच्या एका भागात अतिशय संपन्न, श्रीमंत लोक आहेत तर दुसऱ्या भागात दारिद्र्यात खितपत पडलेले लोक आहेत. भांडवलशाहीचा फायदा अमेरिकासारख्या देशाला झाला. जेथे लोकसंख्या कमी आहे अशा ठिकाणी लोकांचे

राहणीमान सुधारले परंतु भारतासारख्या देशात मात्र भांडवलशाहीचे फायदे मिळू शकले नाहीत. त्यामुळे भांडवलशाही ही मुळापासून उखडून टाकली पाहीजे असे मत प्रतिपादन करतात.

खाजगी मालकी नष्ट करून उत्पादन साधनावर समाजाची मालकी प्रस्थापित करणे हे साम्यवादाचे उद्दिष्ट आहे. या उद्दिष्टाच्या पूर्ततेसाठी क्रांतीला साम्यवादात अनिवार्य मानले आहे. म्हणूनच क्रांतीच्या मार्गाचा विरोध करून लोहिया यांनी साम्यवादी विचारसरणीवर टीकास्त्र सोडले. शिवाय साम्यवादांच्या मते स्वयंचलित समाज निर्माण होईल व त्यात सरकारची सुद्धा गरज राहणार नाही. परंतु लोहियांच्या मते ही बाब सहज शक्य नाही तसेच त्यासाठी हुकुमशाही निर्माण करावी लागणार व हुकुमशाही निर्माण करणे हे नैतिकदृष्टया अयोग्य आहे. त्यातच भांडवलशाहीतील उत्पादन व्यवस्था ही साम्यवादी समाजव्यवस्थेतही कायम असणार आहे. म्हणजे मोठ्या यंत्राच्या साह्याने उत्पादन होत राहणार एकूणच यात केवळ उत्पादन संबंधच बदलले जाणार आहे. म्हणूनच लोहिया यांनी साम्यवादाचाही खरपूस समाचार घेतलेला आहे.

भांडवलशाही व समाजवादी या दोन्ही व्यवस्थेमध्ये राजकीय व आर्थिक सत्तेचे केंद्रीकरण आहे. या दोन्ही व्यवस्था ताटर असून त्यांचे परस्पराशी बरेच साम्य आहे. भांडवलशाहीतून विषमतेचा जन्म होतो तर साम्यवादामुळे व्यक्तीची उपक्रमशीलताच नष्ट होते. तशातच या दोन्ही व्यवस्था अप्रस्तुत ठरलेल्या असून गरिबी, भीती आणि युध्द या प्रश्नांना उत्तरे देऊ शकलेले नाही. जगात बराच भाग दारिद्रयात असून यातून त्यांची सुटका झालेली नाही. त्यातच भांडवलशाही राष्ट्रे आपले व्यक्तिगत उद्दिष्ट सफल करीत असतात. तर साम्यवादी राष्ट्रे आपले तंत्रज्ञान व साधने यांचा निपात करण्यास तुटपुंजी ठरत असतात. जगातील दोन तृतीयांश लोक आफ्रिका व आशिया खंडात राहतात. त्यांचे दु:ख दूर करणे हे भांडवलदार व साम्यवादी या दोहोनाही दूरची बाब आहे. उलट तंत्रज्ञान विकसित करून मुक्त व्यापाराने लोकशाहीवर आपला दबका ठेऊन संघर्ष दाखवून गरीब राष्ट्राचे शोषण करतात. हेच चित्र लोहिया प्रतिपादित करतात.

**सत्तेचे विकेंद्रीकरण :-**

राज्यकारभार चालविण्याकरिता राज्यसंस्था ही उपयुक्त व अनिवार्य जरी असली तरी ती राबवितांना विशेष दक्षता घ्यायला पाहिजे असे लोहियांचे मत होते. त्यासाठीच त्यांनी सत्तेच्या विकेंद्रीकरणाचा कट्टर पुरस्कार केला. सत्तेचे केंद्रीकरण भांडवलशाही राज्यव्यवस्थेतील असो व साम्यवादी व्यवस्थेत असो ते घातक असून त्यामुळे व्यक्तीची उपक्रमशीलता, साधन समृद्धता, धाडसीपणा आणि निर्णयक्षमता कमी होते.

असे ते म्हणतात. लोहिया यांनी लोकशाही व्यवस्थेचा कट्टरपणे पुरस्कार केला आहे. राजकीय व आर्थिक सत्तेचे विकेंद्रीकरण हा लोकशाहीचा सर्वश्रेष्ठ गुण आहे असे ते म्हणतात. त्यामुळेच भारतीय समाजवादाचे फक्त अर्थव्यवस्थेतच नव्हे तर राजकारणातही विकेंद्रीकरणाचा आग्रह धरला पाहिजे. असे लोहियांचे समाजवादी मत होते. राजकीय सत्ता एक व दोन ठिकाणी केंद्रित न ठेवता स्थानिक स्वराज्य संस्थाकडे स्थानिक अधिकार सुपूर्द करून प्रत्यक्ष लोकशाहीच्या रूपाने हाताळण्यातून व्यक्त व्हायला पाहिजे असे ते म्हणतात. सार्वभौमत्वाचा मक्ता केंद्र किंवा राज्य सरकारकडे संपूर्णता सुपूर्द न करता देशाची एकात्मता व अखंडता सांभाळून गावपातळीवरच्या व शहरपातळीवरच्या स्थानिक स्वराज्य संस्थांना अधिकार दिले पाहिजे. गाव सरकारला जेवढे अधिकार असतील तेवढे लोकांना लोकशाहीचे मोल समजेल व त्यातच लोकशाही समाजवादाच्या दिशेने पावले टाकण्याची प्रेरणा त्यांना मिळेल आणि लोकशाही समाजवादाचा पाया भर भक्कम होईल असे लोहिया यांना वाटते. याकरिता लोहिया यांनी स्थानिक शासनाचे अधीकार हे संविधानात नमूद असले पाहिजे व त्यातच संविधानाने स्थानिक स्वराज्य संस्थांना वैधानिक व कार्यकारी अधिकार देण्याचा आग्रह धरला. लोकांच्या सत्याग्रही संघर्षाची आणि गावपातळीपर्यंत सत्ता सोपविण्याची गरज आहे. ती गरज पूर्ण झाल्यास लोकशाही समाजवाद अस्तित्वात राहू शकेल असे लोहिया सुचवितात. एकूणच सर्वसामान्य माणसापर्यंत आर्थिक व राजकीय सत्ता पोहचविणे तसेच सर्वच क्षेत्रात राष्ट्रीय उत्पन्नाची निर्मिती व वितरण आणि उपभोग या क्षेत्रात सहकारी तत्वाचा अवलंब करण्यास प्रोत्साहन देऊन नोकरशाहीस पायबंध घालणे असा राममनोहर लोहिया यांचा समाजवाद होता.

स्वातंत्र्य व समता हे समाजवादाचे **आधारस्तंभ :–**

व्यक्तीविकास ही मानवी कल्याणाची बाजू आहे सभ्यता, शिक्षण, संस्कृती हे मानवी स्वातंत्र्याचे अविभाज्य अंग आहे. जीवनाच्या किमान क्षेत्रात तरी राज्य, शासन, संघटना व समूह यांच्या नियंत्रणापासून मुक्त असायला पाहिजे. कौटुंबिक व्यवहार, मनोरंजन, विवाह व्यवस्था, पक्ष सदस्यत्व या बाबतीत व्यक्तीच्या खाजगीपणाचा हक्क अमर्याद असावा असे लोहिया म्हणतात. व्यक्ती स्वातंत्र्याच्या कल्पनेचे लोहिया यांना विशेष आकर्षण होते. ते स्वातंत्र्याला सर्वश्रेष्ठ मूल्य मानत होते. ते व्यक्तीला विचार विवेकयुक्त आणि साधन निर्मितीक्षम प्राणी मानतात. त्यामुळेच त्यांना समुदायाने व्यक्तीच्या खाजगीपनावर आक्रमण करणे नामंजूर होते. माणसाला निवड करण्याचे आणि चुका करण्याचे स्वातंत्र्य असेल तरच

त्याला रुची, तारतम्य, ज्ञान आणि शहाणपण लाभण्याची शक्यता अधिक असते अशी त्यांची भूमिका होती.

स्वातंत्र्या सोबतच उत्तम मानवी जीवन जगण्यासाठी समतेची सुद्धा तेवढीच आवश्यकता असते. असा विचार लोहिया यांनी मांडला. समतेशिवाय स्वातंत्र्य अस्तित्वात येऊच शकत नाही. म्हणूनच त्यांनी व्यात्कीहीत व समुदायहित यांचा समन्वय साधण्याचा प्रयत्न केला. डॉ. लोहिया यांच्या मते समता हे तत्व केवळ मालमत्ता धारण करणे किंवा उत्पन्न यापुरताच मर्यादित नसून किंवा समान संधी समान क्षमता किंवा समान श्रमांना समान मोबदला एवढ्याच गोष्टीशी समता या तत्वाचा सबंध नसून स्त्री-पुरुष विषमता, वर्णभेद, जातीभेद, गुलामगिरी व पारतंत्र्य, मालमत्तेच्या मालकीतील विषमता, व्यक्तिगत जीवनातील अतिक्रमणे तसेच आंतरराष्ट्रीय क्षेत्रातील शस्त्रसज्जते बाबत असणारी विषमता या सर्व बाबतीतील विषमता नष्ट करणे होय. समता ही एक व्यावहारिक बाब म्हणून तिच्याकडे पहिले पाहिजे असे ते म्हणतात. एकूणच समता नसेल तर स्वतंत्र्य हा केवळ आभास ठरतो. स्वातंत्र्य व समता ह्या दोन्ही संकल्पना अविभाज्य असून प्रत्येक व्यक्तीला आत्मसाक्षात्काराची समान संधी देणारा समाजच त्यांना स्वतंत्र्यपूर्ण व न्यायपूर्ण समाज वाटतो.

**भारतातील समाजवाद :-**

समाजवाद स्वीकारला पाहिजे हे स्पष्ट करतांना युरोपातील समाजवाद व भारतातील समाजवाद असा फरक लोहिया यांनी केला. भारतासारख्या देशामध्ये जेथे उत्पादनाची साधने नव्याने उभी करावयाची आहेत तेथे केवळ शांततामय किंवा सनदशीर मार्गानेच जावे लागेल असे नाही तर क्वचितच संघर्ष देखील करावा लागेल परंतु तो संघर्ष लोकशाही मार्गानेच करावा हुकुमशाही मार्गाने नव्हे असे मत लोहिया यांनी मांडले आहे. त्यातच समाजवाद साधण्यासाठी जी संघटना उभी करावयाची ती लोकशाही मार्गाने करावी असे लोहिया सांगतात. जनतेच्या आकांशाचे संघटन केले पाहिजे, अन्यायाविरुद्ध संघर्ष केला पाहिजे, रचनात्मक कार्य केले पाहिजे असे स्पष्ट करून यासाठी त्यांनी फावडे, मतपेटी व तुरुंग अशी त्रिसूत्री सांगितली होती.

थोडक्यात भारतात समाजवाद साधतांना तो अहिंसेच्या मार्गाने साधने लोहिया यांना अपेक्षित होते. म्हणूनच त्यांनी सहकारावर आधारलेली किंवा स्वावलंबी अर्थव्यवस्थेचा आग्रह धरला. भारताच्या लोकसंख्येचा विचार करता त्यांनी श्रमप्रतिष्ठा ह्या संकल्पनेवर भर दिला. उत्पादन साधनामध्ये जसे भांडवलाला महत्व असते तसेच महत्व श्रमांनादेखील दिले जावे यासाठीच त्यांनी छोट्या यंत्रावर भर देणारी अल्पप्रमाण यंत्र ही संकल्पना मांडली.

**निष्कर्ष :-**

भांडवलशाही व्यवस्थेतील आत्यंतिक विषमतेला आणि ती निर्माण करणाऱ्या व्यक्तीवादाला विरोध करून विकसित झालेला विचार व साम्यवादी व्यवस्थेतील कामगार वर्गाच्या व सर्वाहारांच्या हुकुमशाहीच्या विरोधातून विकसित झालेला विचार या दोन्ही विचारातून मध्यममार्गी विचार म्हणून जो समाजवादी विचार भारतीय विचारवंतांनी मांडला त्यात राममनोहर लोहिया यांच्या समाजवादी विचारांचा समावेश होतो. असे असले तरीही उत्पादन साधनावरील खाजगी मालकी कमी करणे व उद्योगधंद्यांचे राष्ट्रीयीकरण करणे या दोन्ही गोष्ठी साध्य करणे अशा नेहरूच्या विचारसरणीचा लोहिया विरोध करतांना दिसतात. या ऐवजी व्यक्तीच्या स्वावलंबन वाढीसाठी उद्योगधंदे हे सहकारी तत्वावर चालविले जावेत असा विचार त्यांनी मांडला. हिंसाधीष्टीत संघटनांना सामाजवादाने विरोध केला पाहिजे असा अहिंसक विचारही त्यांनी प्रतिपादन केला आहे. एकूणच लोहिया यांनी भारतीय समाजवादाचा विचार मांडतांना साम्यवाद, भांडवलशाही व गांधीवाद या तीन्ही मधील ग्राह्यांश घेण्याची तयारी दाखविली आहे.

**संदर्भ :-**

लोटे रा. ज., २००९, भारतीय राजकीय विचार, पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर.

डॉ. फाडीया बि. एल., २००६, राजनीती विज्ञान, प्रतियोगीता साहित्य सिरीज, साहित्य भवन पब्लिकेशन, आग्रा.

श्री. यादव आनंद, २००२, आधुनिक भारतातील राजकीय वारसा, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.

भोळे भा. ल., १९९८, भारतीय आणि पाश्चिमात्य राजकीय विचारवंत, पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर.